पुढारी | पुणे, रविवार
२९ एप्रिल २०१८



पंख संस्थेद्वारे उन्हाळी शिबिरात संगीत गाणे शिका व तणावमुक्त जगा.

# घुले विद्यालयात उन्हाळी शिबिर

मांजरी : क्रिकहिल फाउंडेशन व पंख संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने; शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेचे के.के. घुले विद्यालय, मांजरी, येथे एक दिवशीय उन्हाळी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरांतर्गत मानसशास्त्रज्ञ आनंद गोडसे यांनी आफ्रिकन वाद्य जेम्बे हे वेगवेगळ्या तालात कसे वाजवावे हे शिकविले. योगेश डोंगरे यांनी मुलांना संस्कार भारतीची रांगोळी शिकवली. स्मिता आपटे, पंख संस्था प्रमुख यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. सचिन भापकर यांनी प्रास्ताविक केले.